वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

*दुरध्वनी क्रमांक* - 0253-2598545
*E-mail ID - ccftnashik.mahaforet.gov.in*
*ccfnashik2012@gmail.com*

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन, वन विभाग

*मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालय,*
*अरण्यसंकुल, जुना आग्रा रोड, राम गणेश गडकरी चौक,*
*त्र्यंबक नाका, नाशिक 422 002*

जा.क्र.कक्ष-2/जमीन/प्र.क्र.04/21.22/ 143 /2021.22 दिनांक :- 9 /06/2021

प्रति,

मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य,नागपुर

विषय :- वन जमीन - नाशिक
प्रवाही वळण योजना ननाशी करीता वन (संवर्धन)-1980 अंतर्गत 3.48 हेक्टर वनजमीन वळतीकरण प्रस्तावाबाबत...

संदर्भ :- उप वनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-3/ जमीन/कॅम्पा/106/, दिनांक 23/04/2021

प्रस्तुत विषयांकित प्रकरणी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, नाशिक यांनी नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यातील मौजे ननाशी प्रवाही वळण योजने करीता वन (संवर्धन)-1980 अंतर्गत वनेत्तर प्रयोजना करिता 3.48 हेक्टर वनजमीन वळतीकरण प्रस्ताव उप वनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक यांचेकडेस सादर केलेला होता. सदरचा प्रस्ताव उप वनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक यांनी संदर्भिय पत्रांन्वये शिफारशीसह चार प्रतींत या कार्यालयास सादर केलेला आहे. या प्रस्तावाची माहिती उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांचेकडील http://forestsclearance.nic.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरण्यात आली असून, आयडी क्रमांक- FP/MH/IRRIG/48480/2020 असा आहे.

**2.00** उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक वनविभागाच्या अंतर्गत येत असलेल्या खालील दर्शविलेल्या वनक्षेत्रातील ननाशी प्रवाही वळण योजने करीता वनजमीन मिळणेकामी लागणा-या वनजमीनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| District | Taluka | Village | Forest Sur.No. | Forest Gut.No. | Status of forest land | Forest area acquired (ha) |
|---|---|---|---|---|---|---|
| Nashik | Dindori | Nanashi | -- | 141 | Reserved Forest | 1.25 |
| | | | -- | 193 | Reserved Forest | 2.23 |
| Total | | | | | | **3.48** |

**3.00** विषयांकित प्राप्त प्रस्ताव प्रकरणी, वनेत्तर प्रयोजनाकरिता वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गतचा विहित प्रपत्रात प्रस्ताव तयार करुन 3 प्रतींत (पृष्ठ क्र. 01 ते 190) यासोबत जोडून मंजूरीस्तव व पुढील कार्यवाहीकामी सादर करणेत येत आहे. तसेच, सदर प्रस्तावातील प्रकल्प यंत्रणा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, नाशिक व उप वनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक

यांचेकडील आणि इतर महत्त्वाचे प्रमाणपत्र यांची नस्ती यादी क्रमांकासह प्रस्तावात जोडण्यात येत आहे.

**4.00** सदर प्रकरणी प्रकल्प यंत्रणेने वन जमिनीवर कोणतेही काम केलेले नसल्यामुळे वन (संवर्धन) अधिनियम 1980 किंवा त्या अंतर्गत सुचनांचा भंग झालेला नाही. त्याबाबत उप वनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र प्रस्तावात पृष्ठ क्रमांक 28 वर जोडले आहे.

**5.00** प्रकल्पासाठी वळते होणारे 3.48 हे. वनक्षेत्राचे बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेले नाशिक वन परिक्षेत्रातील मौजे होलदारनगर ता.त्रंबक, जि.नाशिक येथील गट नंबर 13 मधील एकुण 31.97 हे. आर पैकी 3.48 हे. आर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरणाकरिता लागणारी रक्कम रु.23,33,420/- (रुपये तेवीस लक्ष तेहतीस हजार चारशे विस मात्र) इतकी येत असून त्याबाबतचे रेडी रेकनर पृष्ठ क्रमांक 50 व पर्यायी वनीकरण क्षेत्र दर्शविणारे नकाशे पृष्ठ क्रमांक 20 समाविष्ठ केलेले आहेत.

**6.00** सदर प्रस्तावा करिता बाधित होणा-या 3.48 हे. वनक्षेत्रावर विविध प्रजातीचे एकुण 21 वृक्ष येत आहे. तथापि केंद्र शासनाचे पुर्व परवानगीशिवाय वृक्षतोड होणार नाही त्याबाबतचे प्रमाणपत्र पृष्ठ क्रमांक 80 वर समाविष्ट करण्यात आलेले असून एकुण 21 वृक्षांची यादी मुल्यांकनाचे रक्कमेसह पृष्ठ क्रमांक 56 वर समाविष्ठ करण्यात आलेली आहे.

**7.00** सदर प्रस्तावा करिता लागणारी नेट प्रेझेंट व्हॅल्यु रक्कम देण्यास तयार असले बाबत हमी पत्र सादर केले आहे ते प्रस्तावात समाविष्ट आहे. (पृष्ठ क्र.76) प्रकल्प यंत्रणेने नेट प्रेझेंट व्हॅल्युची रक्कम ही शा.नि.क्र. एस-30/1106/प्र.क्र.189/फ-10 दिनांक 28/11/2008 च्या प्रवर्ग प्रतवारी नुसार परिगणना करण्यात आलेली आहे. तथापि केंद्र शासन पत्र क्र.एफ.5-3/2007/एफसी दिनांक 5/2/2009 प्रमाणे नेट प्रेझेंट व्हॅल्यु रक्कम ही इको मुल्य प्रवर्ग-1, खुले जंगल श्रेणी-1 नुसार प्रति हेक्टर 7,30,000/- प्रमाणे 3.48 हेक्टर क्षेत्रा करिता एकुण रक्कम रु.25,40,400/- इतकी येते. त्याबाबतचे प्रमाणपत्र पृष्ठ क्रमांक 38 वर समाविष्ठ करण्यांत आलेले आहे.

**8.00** वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्तावात मिनिस्ट्री ऑफ इन्व्हायरमेंट ॲण्ड फॉरेस्ट (एफसी डिव्हीजन) नवी दिल्ली यांचे पत्र क्र.11-9/98/एफसी/पीटी दिनांक 5/7/2013 नुसार जिल्हाधिकारी यांनी द्यावयाचे नविन नमुन्यातील (a) linear प्रमाणपत्र प्रस्तावात पृष्ठ क्रमांक 142 वर जोडलेले आहे.

**9.00** प्रकल्प यंत्रणेने सदर प्रस्तावामध्ये वनेत्तर क्षेत्राचे ऑनलाईन 7/12 उतारे मराठी व इंग्रजी मध्ये सादर केलेले आहेत तसेच उक्त प्रस्तावात वळतीकरण होणा-या क्षेत्राची व पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावीत केलेल्या क्षेत्राची KML File सी.डी. प्रस्तावामध्ये जोडण्यात आलेली आहे. (पृष्ठ क्रमांक 17 )

**10.00 प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने ननाशी वनपरिक्षेत्रातील रोपवाटीकेसाठी व इतर कामासाठी प्रकल्प यंत्रणेने वन विभागा करिता मोफत पाणी पुरवठा करावा अशी अट प्रस्ताव मंजुरीच्या आदेशात समाविष्ट करण्यात यावी.**

11.00 प्रस्तुत प्रस्तावास उप वनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक यांनी केलेल्या शिफारशी नुसार, मौजे ननाशी प्रवाही वळण योजने करीता वन (संवर्धन)-1980 अंतर्गत वनेत्तर प्रयोजना करिता 3.48 हेक्टर वनजमीन वळती करणे बाबतचा प्रस्ताव निम्न स्वाक्षरीकर्ते यांचे पार्ट-3 मधील शिफारससह तीन प्रतींत यासोबत पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येत आहे.

सहपत्र :- वरील प्रमाणे

( नितिन गुदगे )
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नाशिक**

**प्रतिलिपी :-** उप वनसंरक्षक, पश्चिम भाग नाशिक यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रतिलिपी :-** कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, नाशिक यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

---0---

## (Part-III)

## (To be filled by the Concerned Chief Conservator of Forests)

**Name of the Proposal-** Diversion of 3.48 ha. Reserve forest land for Gravity Diversion Scheme Nanashi Link Cut/Canal, Tal Dindori, Dist. Nashik

Total Forest Area in project = 3.48 ha.

Total Forest Area in West Nashik Division = 3.48 ha.

**( West Nashik Division )**

| | | |
|---|---|---|
| 1. | Whether Site, where the forest land involved is located has been inspected by concerned Chief Conservator of Forests (Yes / No). If yes, the date of inspection & observations made in form of inspection note to be enclosed. | No |
| 2. | Whether the concerned Chief Conservator of Forests agree with the information given in Part-II and the recommendations of the Dy.Conservator of Forests. | Yes |
| 3. | Specific recommendation of concerned Chief Conservator of Forests for accepatance or otherwise of the proposal with detailed reasons. | This proposal is of great use for fulfilling the water requirement. |

**(Nitin Gudge)**
**Chief Conservator of Forests**
**(Territorial) Nashik**

**Place - Nashik.**
**Date- 9 /06/2021**